# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९१८, २५५७७९०५
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट: www.new.srapune.gov.in


झो. पु. प्रा.
निश्चयेन परिवर्तनम्।
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

४८८
०३।०६।२०२५

जा.क्र.झोपुप्रा/तां.१/भोप्र/मा.क्र.१९२/१५३३ /२०२५
दि. /०५/२०२५
०२।०६।२०२५

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) प्रथम बांधकाम परवानगी (C.C.)जा.क्र.झोपुप्रा/२१९/२०१५ दि. ११/०२/२०१५.
२) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा/७४८/२०२५ दि.१३/०३/२०२५.
३) वास्तुविशारद व्ही.एस. कुंभार यांचे भोगवटा मागणी पत्र दि.२६/०३/२०२५.

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे मौजे हडपसर, स.नं.४अ/३अ/१ब/१, ३अ/१ब/२, ३अ/२/१, ३अ/२/२, ३ब, ३क/१,३क/२, ३ड/२, ३ई, गाडीतळ, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून झोपुप्रा/७४८/२०२५ दि.१३/०३/२०२५ अन्वये सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीमधील काम पूर्ण झाल्याने, सदर योजनेतील उर्वरित पुनर्वसन व विक्री घटक सदनिकांकरीता तसेच योजनेसाठी अंतिम भोगवटा पत्र मिळण्याबाबत प्रकल्पाचे वास्तुविशारद व्ही.एस. कुंभार यांनी उपरोक्त वाचा ३ मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार पुनर्वसन इमारतीसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० चे नियम क्र.२.११ अन्वये अंतिम भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे देणेत येत आहे.

मंजुर बांधकाम नकाशानुसार इमारत निहाय तरतुद खालीलप्रमाणे आहे.

संयुक्त विंग A व B -

| अ. क्र | मजले | सदनिका/दुकान क्र. | | एकुण सदनिका/दुकाने |
|---|---|---|---|---|
| | | विक्री घटक | पुनर्वसन घटक | |
| १ | तळमजला | दुकान क्र.६ (विंग A) | दुकान क्र. ४ + ४अ (विंग A) | दुकाने ३ + पार्किंग |
| २ | पहिला मजला | --- | सदनिका क्र.१०९ | ०१ सदनिका |
| ३ | दुसरा मजला | सदनिका क्र. २०७ अ + २०८ | सदनिका क्र. २०९ | ०३ सदनिका |
| ४ | तीसरा मजला | --- | सदनिका क्र.३१० | ०१ सदनिका |
| ५ | चौथा मजला | --- | सदनिका क्र.४१० | ०१ सदनिका |
| ६ | पाचवा महला | सदनिका क्र.५०४ A +५०४ B | सदनिका क्र.५०९ | ०३ सदनिका |
| ७ | सहावा मजला | --- | सदनिका क्र.६०९ | ०१ सदनिका |
| ८ | सातवा मजला | --- | सदनिका क्र.७०९ | ०१ सदनिका |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | आठवा मजला | -- | सदनिका क्र.८०९ | ०१ सदनिका |
| १० | नऊवा मजला | -- | सदनिका क्र.९०१ | ०१ सदनिका |
| | | ०४ सदनिका + ०१ दुकान | ०९ सदनिका + ०२ दुकाने | १३ सदनिका + ०३ दुकाने + पार्किंग |
| एकूण | | ०९ पुनर्वसन सदनिका + ०२ पुनर्वसन दुकाने + ०४ विक्री घटक सदनिका + ०१ विक्री घटक दुकान + पार्किंग | | |

पुनर्वसन घटक :- ०२ दुकाने + १० सदनिका + पार्किंग
विक्री घटक :- ०१ दुकान + ०४ सदनिका

अटी:-

१) प्रस्तुत अंतिम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कारवाई करण्यात येईल.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

२) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

३) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

४) इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

५) दि. १५/१०/२०१९ रोजीच्या अंतिम अग्निशमन विभागाकडील नाहरकत प्रमाणपत्रामधील सर्व अटी व शर्ती विकासक यांच्यावर बंधनकारक राहतील.

६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

७) लिफ्टस, STP, Fire hydrant, Generator backup system व Water pumping इ.बाबत विकसकाने त्यांच्या खर्चाने ५ वर्षाकरिता वार्षिक देखभाल करार (AMC) करणे बंधनकारक राहील.

८) विषयांकित योजनेतील रस्तारुंदीकरणाखालील १७६.६० चौ.मी. क्षेत्र म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, अंतिम टप्प्यातील टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

९) अंतिम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची, खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

१०) उपरोक्त बाबीचे अवलोकन करता प्रस्तुत योजनेच्या विकसकाने बांधावयाच्या पुनर्वसन इमारतीची गुणवत्ता राखणे, देखभाल करणे इतर विषयाची संपूर्ण जबाबदारी विकसकाने

नेमणूक केलेल्या वास्तूविशारद, स्ट्रक्चरल कन्सल्टंट व लायसन होल्डर Site Engineer यांची व पर्यायाने विकसकाची राहणार आहे.

११) **मौजे हडपसर, स.नं.४अ/३अ/१ब/१, ३अ/१ब/२, ३अ/२/१, ३अ/२/२, ३ब, ३क/१, ३क/२, ३ड/२, ३ई, गाडीतळ, पुणे या झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन दुकानांचे वाटप,** भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

{मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दि.१३/०५/२०२५ रोजीचे मान्यतेने}

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

**सहायक संचालक नगर रचना ,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत:-

१. **विकसक मे. भोसले - तुपे डेव्हलपर्स,**
सी-१०१, मेघा सेंटर, मगरपट्टा सिटी, हडपसर, पुणे.

२. **वास्तुविशारद- श्री. विजय कुंभार,** स.नं. ४०५/४०६, रास्ता पेठ, पुणे

३. **तहसिलदार,**ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव अग्रेषित.

४. **संगणक अधिकारी,** झोपुप्रा,पुणे. यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित